# प्रकरण सहावे

# संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

<u>प्रकरण</u> <u>सहावे</u>

# संशोधनाचा सारांश,निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना

६.२ संशोधनाचा सारांश

६.३ निष्कर्ष

६.४ शिफारशी

६.५ पुढील सेशोधनासाठी विषय

# प्रकरण सहावे

## संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

### ६.१ प्रस्तावना

प्रकरण १ ते ४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाचा आढावा घेतला आहे. वरील प्रकरणे तात्विक स्वरुपाची आहेत प्रकरण ५ मध्ये प्राचार्य प्राध्यापक संस्थाचालक व शासकीय अधिकारी यांच्या प्रतिसादातून आणि कनिष्ठ महाद्यालयांना दिलेल्या भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेल्या माहितेची विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. यावरुन संशोधकाने प्रस्तुत प्रकरणात सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी दिलेल्या आहेत.

### ६.२ संशोधनाचा सारांश :-

प्रस्तुत संशोधनाचा सारांश प्रकरणानुसार खालीलप्रमाणे दिला आहे.

<u>प्रकरण १ ले</u>

यामध्ये संशोधनाची पाशर्वभूमी देवून संशोधनाची निवड कशी केली, संशोधनाची उदि्दष्ठे कोणती? संशोधनाचीगरज काय व त्याचे महत्व कोणते हि माहिती दिली आहे. तसेच प्रकरणांचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रकरण २ रे :-

यामध्ये प्रस्तुत संशोधनासाठी पूरक विविध संदर्भ ग्रंथाचा अभ्यास करुन आवश्यक ती माहिती मिळविण्यात आली आहे. तसेच संबंधित संशोधनाचा अभ्यास करण्यात आला आहे यामध्ये एकूण ९ संबंधित संशोधनाचा अभ्यास केला आहे.

प्रकरण तिसरे :-

यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजनाचा अभ्यास करताना नियोजनाची व्याख्या, महत्व, गरज इत्यादी विषयी माहिती दिली आहे. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्रशासनाची व्याख्या महत्व व गरज इत्यादीची माहिती दिली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन व प्रशासनातील घटकांची माहिती देण्यात आली आहे. ती खालील प्रमाणे

१) प्राचार्य - कर्तव्य, अधिकार, शैक्षणिक व व्यासायिक पात्रता

२) प्राध्यापक - शैक्षणिक व व्यासायिक पात्रता, कार्यभार, इत्यादी

३) विद्यार्थी - वय, शाखा निवडण्याचे स्वातंत्र्य इत्यादी

४) संस्था प्रशासन - संस्थेची एकंदरीत जबाबदारी व कार्यभार

५) शासकीय प्रशासक - विविध विभागांचे कार्य विभाजन, अधिकाऱ्याचे कर्तव्ये अधिकार शिक्षण उपसंचालकाचे प्रशासकीय अधिकार,

६) शैक्षणिक घटक - क) विद्यार्थी संख्या ख) वर्गतुकडयांची संख्या ग) इमारत घ) फर्निचर च) प्रयोगशाळा छ) ग्रंथालय ज) शैक्षणिक साधने झ) अनुदान ट) परीक्षा व मूल्यमापन

वरील घटकांची सविस्तर माहिती दिली आहे.

प्रकरण चौथे :-

या प्रकरणात खालील घटकांची माहिती देण्यात आली आहे.

संशोधन पध्दती :- संशोधनाच्या तीन प्रमुख पध्दतींची माहिती देऊन सर्वेक्षण पध्दतीची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

नमुना निवड :- यात नमुना निवडीचे महत्व सांगून निवड कशी केली त्याबद्दल माहिती दिली आहे.

संशोधनाची साधने :- संशोधनाच्या विविध साधनांचा अभ्यास करुन प्रस्तुत संशोधनासाठी लागणाऱ्या साधनांची माहिती दिली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे साधने वापरली आहेत.

१) प्रश्नावली :- प्राचार्यासाठी प्रश्नावली तयार केली .

२) मुलाखत :- खालील प्रतिसादकांच्या मुलाखती घेतल्या .

क) प्राध्यापकांच्या मुलाखती

ख) संस्थाचालकांच्या मुलाखती

ग) शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती

३) भेटी व निरीक्षण :- प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयास भेट देऊन तेथील सद्य स्थितीची माहिती भौतिक व मानवी घटकांसंदर्भात संकलित केली.

प्रकरण पाचवे :-

यात खालील मथळयाखाली संकलित माहितीचे विश्लेषण वर्गीकरण व अर्थनिर्वचण करण्यात आले आहे.

प्रश्नावलीच्या साहयाने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

क) प्राचार्यांची वैयक्तिक माहिती :- यात प्राचार्यांचे संपूर्ण नांव, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी माहिती संकलित केली.

ख) कनिष्ठ महाविद्यालयांची सर्व सामान्य माहिती :- यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या अंतर्गत बाबींसबंधी माहिती संकलित केली.

ग) कनिष्ठ महाविद्यालयातील व्यवस्थापनाविषयी माहिती :- यामध्ये स्थानिक समिती, प्राचार्य यांचे संबंधाविषयी माहिती संकलित केली.

घ) प्राध्यापकांच्या नियोजन व प्रशासनाविषयी माहिती :- यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील शाखानिहाय प्राध्यापक संख्या कार्यविभाजन नियोजन सेवांतर्गत प्रशिक्षण, नियुक्ती, बदली, इत्यादी बाबत माहिती संकलित केली.

च) विद्यार्थी प्रशासनाविषयी माहिती :- यामध्ये विद्यार्थ्यांचा शाखानिहाय निकाल विद्यार्थ्यांची प्रगती, हजेरी इत्यादी संबंधी माहिती मिळविली.

छ) कर्मचाऱ्यांच्या नियोजन व प्रशासनाविषयी माहिती :- यामध्ये कर्मचारी संख्या कार्यवितरण इत्यादी बाबत माहिती मिळविली.

ज) कनिष्ठ महाविद्यालयांच्या भौतिक सुविधाविषयी माहिती :- यामध्ये इमारत, ग्रथांलय प्राध्यापक कक्ष, प्रयोगशाळा, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, इत्यादी बाबत माहिती मिळविली.

झ) आर्थिक बाबीविषयी माहिती :- शासनाकडून मिळणारे अनुदान, शिष्यवृत्ती, हिशोबतपासणी इत्यादी बाबत माहिती मिळविली.

ट) परीक्षाविषयी नियोजन व प्रशासनाची माहिती :- यामध्ये परीक्षांचे अयोजन परीक्षांची तयारी इत्यादीबाबत माहिती मिळविली

ठ) कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन व प्रशासन सुधारण्यासाठी उपाय :- यात प्रतिसादकांनी सुचविलेल्या विविध उपयांची क्रमबध्द नोंद करण्यात आली आहे.

वरील मथळयाखाली मिळविलेल्या माहितीचे कोष्टकाद्वारे विश्लेषण व अर्थनिर्वचण करण्यात आले आहे.

<u>मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचण</u> :- यामध्ये प्राध्यापक संस्थाचालक व शासकीय अधिकारी यांच्या मुलाखती खालील घटकांमध्ये घेण्यात आल्या .

१) प्राध्यापकांच्या मुलाखती :-

क) वैयक्तिक माहिती

ख) प्रशासनासंबंधी सामान्य माहिती

ग) अभ्यासक्रम विषयक माहिती

घ) विद्यार्थ्यांच्या प्रशासनाविषयी माहिती

च) अध्यापनविषयक माहिती

छ) प्रात्यक्षिकाविषयी माहिती

ज) ग्रथांलयाविषयी माहिती

वरील मुद्दयानुरुप माहिती मिळविली व तिचे विश्लेषण, अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

२) संस्थाचालकांच्या मुलाखती :-

क) सर्वसामान्य प्रश्न

ख) शिक्षकांच्या प्रशासनासंबंधीची माहिती

ग) भौतिक सुविधाविषयीची माहिती

घ) अर्थिक सुविधाविषयीची माहिती

च) प्रशासनात सुचविलेल्या सुधारणा

वरील घटकावर अधारीत माहिती मिळवून विश्लेषन व अर्थनिवर्चन केले आहे.

३) शासकीय अधिकाऱ्यांची मुलाखत :-

क) शासकीय अधिकाऱ्याची वैयक्तिक माहिती

ख) शासकीय अधिकाऱ्याची कर्तव्ये व अधिकार

ग) कनिष्ठ महाविद्यालयातील प्रशासन व नियोजनाबाबत माहिती

<u>भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण</u> :- यातून खालील घटकांना अनुसरुन माहिती मिळविली

क) प्राध्यापकाविषयींची माहिती

ख)भौतिकसुविधाविषयींचीमाहिती

ग) वर्गखोल्या व इतर सुविधाविषयी माहिती

वरील विविध साधनाद्वारे माहिती मिळवून विश्लेषण, वर्गीकरण व अर्थनिर्वचन केले आहे. प्राप्त माहितीवरुन निष्कर्ष काढले व त्यासंदर्भात शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत त्याचबरोबर पुढील संशोधनासाठी विषय सुचविले आहेत.

## ६.३ निष्कर्ष

क) <u>प्राचार्याविषयी निष्कर्ष</u> :-

१) बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिसादक प्राचार्यामध्ये पदव्युत्तर प्रशिक्षित प्राचार्यांचे प्रमाण १३.३३ टक्के होते तर पदवीधर प्रशिक्षित प्राचार्यांचे प्रमाण ७३.३३ टक्के होते अप्रशिक्षित पदव्युत्तर पदवीधारक प्राचार्यांचे प्रमाण १३. ३३ टक्के होते.एकूण असा निष्कर्ष निघतो की, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पदव्युत्तर पदवीसह प्रशिक्षित असणे आवश्यक होते पण १२ कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळांशी संलग्न असल्याने तेथील प्राचार्य आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण न करणारे होते. त्यांच्या अधिकाराखाली काम करणारे प्राध्यापक जास्त पात्रतेचे होते. त्याचा परिणाम त्यांच्या प्रशासनावर होतो ही बाब बार्शी तालुक्याच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाची कमतरता व्यक्त करते.

२) बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य हे १० वर्षापेक्षा जास्त काळ प्राचार्य पदाचा अनुभव असणारे होते पंरतु प्राध्यापक म्हणून अनुभव असणारे एकही प्राचार्य नव्हते कारण माध्यमिकशी संलग्न असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना माध्यमिकचा अनुभव होता तर वरिष्ठशी संलग्न असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापनाचा अनुभव होता. ही स्थिती चांगल्या प्रशासनाच्या दृष्टीने योगय नव्हती.

ख) <u>कनिष्ठ महाविद्यालयाविषयी सर्वसामान्य माहिती</u> :-

३) बार्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयापैकी १२ (८० टक्के) कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिकशी संलग्न होती व ३ (२० टक्के ) कनिष्ठ महाविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न होती

४) कनिष्ठ महाविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयास जोडल्याने विविध फायदे होत असल्याचे सर्वच म्हणजे १५ प्राचार्यांनी सांगितले. ते फायदे असे होते -

१. इमारतीची कमतरता जाणवत नाही.

२. ग्रंथालय समृध असते.

३. प्रयोगशाळा सुसज्य असते.

तर माध्यमिकशी कनिष्ठ महाविद्यालये जोडल्याने खालील फायदे, तोटे दर्शविले :-

फायदे :-

१. शिस्त राहते.

२. हजेरी चांगली राहते.

तोटे :-

१. ग्रंथालय समृध नसते.

२. प्रयोगशाळा सुसज्ज नसते.

यावरुन वरीष्ठ महाविद्यालयांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची गुणवत्ता अधिक असल्याचे दिसून आले.

५) बार्शी तालुक्यातील १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १० (६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांत केवळ कला शाखा होत्या. चार (२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांत कला विज्ञान शाखा होत्या. एका (६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांत कला व वाणिज्य शाखा होती. थोडक्यात कला शाखांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळले.

६) बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील कला शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण ७१.८५ टक्के होते. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण २५.५५ टक्के होते वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण २.५८ टक्के होते. कला शाखेच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक होते.

७) प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांची संख्या ४० ते ८० दरम्यान असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या १२(८० टक्के) होती. एका (६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांत १०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या होती. दोन कनिष्ठ महाविद्यालयांत ४० पेक्षा कमी विद्यार्थी प्रत्येक वर्गात होते.

यावरुन मध्यम विद्यार्थी संख्या असणारी कनिष्ठ महाविद्यालये बहुतांशी होती. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देण्यासाठी व शिस्त राखण्यासाठी ही विद्यार्थी संख्या योग्य होती. विद्यार्थी संख्या अधिक असल्यास खालील समस्या निर्माण होतात असे ८० टक्के प्राचार्यांनी सांगितले.

१. विद्यार्थ्यांवर नियंत्रण राखणे अवघड होते.

२. गैरहजेरीचे प्रमाण वाढते.

३. परीक्षेच्या निकालावर विपरीत परिणाम होतो.

८) बार्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यायांपैकी १४ (९३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये अनुदानीत होती. तर १ (६.६६ टक्के) विनाअनुदानित होते. बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालये अनुदानित होती. ही चांगली गोष्ट होती.

९) एकच कनिष्ठ महाविद्यालय विनाअनुदानित असल्याने तेथे प्राध्यापक पुरेसे नसल्याचे आढळून आले. चौदा (९३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयापैकी ११ (७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राध्यापक पुरेसे होते. परंतु काहींना माध्यमिक तासिका देऊन तासिका देऊन पूर्णवेळ केल्याचे सांगितले. प्रत्यक्ष निरीक्षणामध्ये ८ (५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये पुरेसे प्राध्यापक नसल्याचे दिसून आले.

१०) विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांत प्राध्यापकांना पुरेसा पगार दिला जात नव्हता पुरेसा पगार न दिल्याने विविध समस्या येत असल्याचे ७(४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले.

११) प्रत्येक विषयासाठी तज्ञ प्राध्यापक असल्याचे १४(९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. परंतु प्रत्यक्ष भेटीतून असे आढळून आले की, काही ठिकाणी एकच प्राध्यापक दोन विषय शिकवित होते. त्याचे कारण विचारले असता प्राध्यापकाची नियुक्ती पूर्णवेळ करण्यासाठी दोन विषयात अध्यापन करावे लागते. यावरुन गरज म्हणून अध्यापन करत असल्याचे आढळले.

१२) एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १२ (८० टक्के) माध्यमिकशी संलग्न असलेले ११ (७३.३३ टक्के) प्राध्यापकांना माध्यमिकचे तास घ्यावे लागतात. प्रत्यक्ष निरीक्षणामध्येही कनिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापकांना माध्यमिक शाळेचे तास घ्यावे लागत असल्याचे दिसून आले.

कांही प्राध्यापकांना माध्यमिकच्या ६० टक्के तासिका घ्यावा लागतात. असे असे दिसून आले.

१३) माध्यमिक शाळेच्या तासिका कमी कालावधीच्या असल्याने अभ्यासक्रम पूर्ण होण्यात अडचणी येतात असे ११ (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. प्रत्यक्ष निरीक्षणातून असे आढळले की, माध्यमिकच्या तासिका ३० मिनिटांच्या असतात. वरिष्ठ महाविद्यालयांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांतील तासिका ४५ ते ५० मिनिटांच्या असतात. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी ज्यादा तास घ्यावे लागत नाहीत. परंतू माध्यमिकच्या संदर्भात ही अडचण येते.

ग) <u>कनिष्ठ महाविद्यालयांतील व्यवस्थापनाविषयी निष्कर्ष</u> :-

१४) सर्व १५ कनिष्ठ महाविद्यालयांत स्थानिक समिती असल्याचे आढळले.

१५) तेरा (८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांत व्यवस्थापक समितीच्या वर्षातून सोयीनुसार बैठका होत असल्याचे आढळले. वर्षातून चार वेळा बैठका घेणाऱ्यांचे प्रमाण ५(३३.३३ टक्के) सर्वाधिक होते. दोन (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात बैठका नियमित घेत नव्हते.

१६) स्थानिक समितीचे सदस्य व प्राचार्य यांच्यात मतभेद होत नसल्याचे आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. सात (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी उत्तर देण्याचे टाळले. याबाबत प्रत्यक्ष भेटी व चर्चेद्वारे माहिती मिळविली असता असे आढळले की, संस्थेच्या सदस्यांचे प्राचार्यावर बऱ्याच बाबींमध्ये बंधन असते. त्यामुळे मतभेद करणे. प्राचार्यांना परवडणारे नसते.

घ) <u>प्राध्यापकांच्या नियोजन व प्रशासनासंबंधी निष्कर्ष</u> :-

१७) कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्याही शाखानुसार होती. कला शाखांची संख्या अधिक असल्याने एकूण १००(७० टक्के) प्राध्यापक एम्.ए.बी.एड्. होते. अडतीस (२५.३३ टक्के) प्राध्यापक एम्.एस्.सी.बी.एड्. होते. चार (२.६६ टक्के) प्राध्यापक एम्.कॉम्.बी.एड्. होते. दोन(१.३३ टक्के) प्राध्यापक एम्.ए.एम्.पी.एड्. होते. यावरुन शाखानुसार प्राध्यापकांची संख्या योगय असल्याचे दिसून आले.

१८) बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील सर्वच प्राध्यापक संबंधित विषयातील किमान द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्राध्यापकांच्या मुलाखतीतून आढळून आले.

१९) प्राध्यापक आपल्या आध्यापनाचे नियोजन करतात असे १४(९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले परंतु प्रत्यक्ष निरीक्षण केले असता बहुतेक प्राचार्यांनी नियाजेनाबाबत चौकशी करत नसल्याचे आढळून आले. नियोजनाबाबत स्थिती समाधानकारक नव्हती.

२०) अभ्यासक्रमाचे नियोजन न करणाऱ्या प्राध्यापकांसाठी वेगवेगळया उपाययोजना करत असल्याचे १३ (८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले परंतु प्राध्यापकांच्या मुलाखतीतून असे आढळून आले की, प्राचार्य प्रशासन कार्यातच व्यस्त असतात. त्यामुळे ते प्राध्यापकांच्या नियोजनाकडे लक्ष देत नाहीत. ही चांगल्या प्रशासनाच्या दृष्टीने असमाधानकारक गोष्ट होती.

२१) सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी प्राध्यापकांना पाठवितो असे ११(७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले मात्र प्रत्यक्षात प्राध्यापकांची मुलाखत घेतली असता बऱ्याच प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणही संकल्पनाच माहिती नव्हती. एकूण १५ पैकी ७(४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी त्यांच्या प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठवित होते. असे आढळले. प्राध्यापकांच्या व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने ही बाब हाणीकारक होती. प्राचार्याचा हा दृष्टिकोन कुशल प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हता.

२२) सेवांतर्गत प्रशिक्षणाचा दैनंदिन अध्यापनामध्ये कोणता फायदा झालेला दिसून येतो. याबाबत ८ (५३.३३ टक्के) प्राचार्य जे प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणास पाठवित नाहीत त्यांनी उत्तरे दिली नाहीत. बाकी सात प्राचार्यांनी अध्यापन कौशल्य सुधारणे अध्यापनात नेमकेपणा व अचुकता आली असे फायदे झालेचे सांगितले.

२३) वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविण्यास अडचणी येत नसल्याचे ७ (४६.६६ टक्के) प्राचार्यांनी सांगितले तर ५ (३३.३३ टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी खोल्यांची कमतरता, प्राध्यापकांच्या माध्यमिकच्या तासिका कमी कालावधीच्या असतात अशा अडचणी सांगितल्या पण बहुतेक कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविल्याचे दिसून आले.

२४) प्राध्यापकांची नियुक्ती करताना राखीव जागेमुळे अडचणी येतात. शासनाची मंजुरी मिळविणे व त्या त्या संवर्गातील उमेदवार मिळविणे, ते मिळाले नाहीत तर दुसऱ्या वर्गातील भरणे यामुळे प्राध्यापकांच्या नेमणुका वेळेवर व गुणवत्तेनुसार करता येत नाहीत. असे १०(६६.६६ टक्के) प्राचार्यांनी सांगितले त्यात बरेच तथ्य आहे. तसेच अर्धवेळ व तासिका तत्वावर प्राध्यापक नेमावे लागतात, माध्यमिकला जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कार्यभार पुरेसा नसल्याने माध्यमिकच्या तासिका देणे अशा अडचणी येतात. असे दिसून आले. शासकीय अधिकाऱ्यांनी याला पर्याय नसल्याचे सांगितले.

२५) प्राध्यापकांची नियुक्ती करताना प्राचार्यांचा सल्ला घेतला जातो असे सांगणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १४(९३.३३ टक्के) होती. यावरुन बहुतेक कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या नेमणुका प्राचार्यांच्या सल्याने होतात ही चांगली गोष्ट होती.

बहुतेक कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती होती. त्यामध्ये प्राचार्य एक सदस्य असतात. त्या समितीच्या बैठकीत बदल्या, नियुक्तीविषयी चर्चा होते. त्यामुळे.प्राचार्यांचा सल्ला घेतला जातो. पण कनिष्ठ महाविद्यालयांत स्थानिक समितीच्या बैठका होत नसतील तर असा प्रश्नच येत नाही. पण अशी अगदी थोडी कनिष्ठ महाविद्यालये होती.

२६) प्राध्यापकांच्या बदल्या वर्षारंभी केल्या जातात असे सांगणाऱ्या प्रतिसादकांची संख्या अधिक म्हणजे १० (६६.६६ टक्के) होती. यासंदर्भात प्राध्यापकांची मुलाखत घेंतली असता बहुतेक प्राध्यापकांना बदलीचा प्रश्नच येत नाही. असे सांगितले. केवळ २(१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांच्या एकापेक्षा जास्त शाखा होत्या.

२७) बदली वर्षाच्या मध्येच झाल्यानंतर त्याचे विविध परिणाम होत असल्याचे ११ (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले परंतु बदलीचे संभव असणारी २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय· असल्याने त्यांची उत्तरे सामान्य पणे अशी होती.

१. सदर विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

२. प्राध्यापकांना नवीन ठिकाणी जुळवून घेणे कठिण जाते.

३. वर्गनियंत्रणाची समस्या निर्माण होते.

२८) प्राध्यापकांच्या अध्यापनाचे निरीक्षण करणाऱ्या प्राचार्यांची संख्या १४(९३.३३ टक्के) होती. काही प्रतिसादकांनी अठवडयातून एकदा, महिन्यातून एकदा निरीक्षण करतो अशी उत्तरे दिली. प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षण केले असता. ८(५३.३३ टक्के) प्रतिसादक व्हरांडयातून चक्कर मारत असल्याचे आढळून आले.

यावरुन ७(४६.६६ टक्के) प्राचार्य दैनंदिन अध्यापनाचे निरीक्षण करण्यात दक्ष होते. तर आठ (५३.३३ टक्के) प्राचार्य त्याबाबतीत उदासीन होते. ही स्थिती चांगल्या प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नव्हती.

२९) प्राध्यापक खाजगी क्लास घेत नाहीत असे सर्व १५ प्रतिसादकांनी सांगितले. कायद्याने बंदी असल्याचेही सांगितले. या संदंर्भात प्रत्यक्ष निरीक्षण केले असता बहुतेक सर्वच ठिकाणी कला शाखेकरीता इंग्रजीचे व विज्ञान शाखेकरीता गणित व विज्ञान चे सुट्टीतील तास आयोजित केल्याचे दिसून आले. त्याचे मानधन पालकांशी चर्चा करुन ठरविले असून विद्यार्थ्यांकडून फी न घेतल्याचे लेखी घेण्यात आले. असे बहुतेक ठिकाणी आढळले.

३०) प्राध्यापकांच्या खाजगी क्लासचा वर्ग अध्यापनावर विविध प्रकारचे परिणाम होत असल्याचे ४ (२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. अकरा (३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी उत्तर देण्याचे टाळले. परंतु ज्यांनी खाजगी क्लासचे परीणाम सांगितले ते असे होते.

१. खाजगी शिकवणी घेणारे प्राध्यापक वर्गात काळजीपूर्वक अध्यापन करत नाहीत.

२. शिकवणीला न येणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक शिस्त ठेवतात.

च) <u>विद्यार्थी प्रशासनाविषयी निष्कर्ष</u> :-

३१) बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील निकालांची शाखानुसार माहिती मिळवली असता कला शाखेचा मार्च १९९७ व मार्च १९९८ चा अनुक्रमे निकाल सरासरी ५०.२ टक्के व ६९.३ टक्के होता. विज्ञान शाखेचा मार्च १९९७ व मार्च १९९८ चा अनुक्रमे सरासरी ६३.५५ टक्के व ७४.७ टक्के होता. वाणिज्य शाखेचा मार्च १९९७ व मार्च १९९८ चा सरासरी निकाल ५६ टक्के व ६१ टक्के होता. तिनही शाखांच्या १९९७ च्या निकालापेक्षा १९९८ चा निकालात भर पडल्याचे दिसून आले. यावरुन असे स्पष्ट होते की, विद्यार्थी गुणवत्तेच्या दिशेने अधिक प्रयत्न करीत आहेत. ही समाधानाची बाब आहे.

३२) हे निकाल समाधानकारक वाटतात असे असे उत्तर देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ८(५३.३३ टक्के) होती. तर निकाल समाधानकारक नाहीत असे ७ (४६.६६ टक्के) प्राचार्यांनी मत व्यक्त केले. ते आणखी निकाल वाढविण्याची अपेक्षा बाळगतात. ही चांगली गोष्ट वाटते.

३३) निकाल असमाधानकारक वाटत असल्यास जादा तास घेण्याची व्यवस्था केली जाते. त्याचबरोबर पालकांना सुचना देऊन मार्गदर्शन केले जाते असेही आढळून आले. एकंदरित निकाल वाढविण्यासाठी विविध प्रयत्न करणाऱ्या प्राचार्यांची संख्या ११(७३.३३ टक्के) होती ही समाधानकारक बाब आहे.

३४) अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे प्रयत्न केले जात असल्याचे १४(९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. प्रामुख्याने स्वतंत्र जादा तास होतात असे सांगणाऱ्यांची संख्या अधिक होती.

३५) कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची हजेरी समाधानकारक असल्याचे सांगणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १२(८० टक्के) होती. परंतु प्रत्यक्ष भेटी दिल्यानंतर गैरहजेरीचे प्रमाण जास्त आढळले. हे प्रमाण ग्रामीणपेक्षा शहरी भागात जास्त असल्याचे आढळून आले. शहरी भागातील विद्यार्थी हजेरीबाबत उदासीन दिसून येतात.

३६) गैरहजेरी कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात प्रतिसादकांची संख्या १२(८० टक्के) दिसून आली. यावरुन एकीकडे गैरहजेरी कमी सांगतात. तर दुसरीकडे कमी करण्यासाठी उपाय योजितो असे म्हणतात. ते उपाय असे -

१. पालकांना पत्र पाठवितात.

२. पालकांना समक्ष बोलावून सूचना दिली जाते.

३. शिक्षक पालक मेळावा घेतला जातो.

४. काही प्रमाणात शिक्षा केली जाते.

छ) <u>कर्मचाऱ्यांच्या नियोजन व प्रशासन विषयीचे निष्कर्ष</u> :-

३७) शासकीय नियमानुसार लिपिक , सेवक संख्या आहे का नाही हे पहाताना असे दिसून आले की, वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न,कनिष्ठ महाविद्यालयात त्याचप्रमाणे माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अशा एकूण ११(७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये लिपीक सेवक संख्या पुरेशी होती. पाच (३३.३३ टक्के)

कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये लिपीक सेवक पुरेसे नव्हते. चार (२६.६६ टक्के) महाविद्यालयात विज्ञान शाखा नसल्याने प्रयोग शाळा सहाय्यकाची गरज नव्हती.

मात्र कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयाचा कर्मचारी वर्ग स्वतंत्र नाही. वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयामध्ये वरिष्ठ महाविद्यालयाचा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग काम करतो. तर माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयामध्ये माध्यमिकचा कर्मचारी वर्ग काम करतो.

३८) कर्मचारी वर्गाची कमतरता असल्याने विविध अडचणी येतात असे सर्वच १५ प्रतिसादकांनी सांगितले. प्रत्यक्ष प्राध्यापकांच्या मुलाखतीमध्ये त्यांनी सांगितले की कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्ती केली जात नसल्याने बरीच कामे स्वतःला करावी लागतात.

ज) <u>कनिष्ठ महाविद्यालयाच्या भौतिक सुविधाविषयीचे निष्कर्ष</u> :-

३९) विद्यार्थी संख्येनुसार इमारत असल्याचे १२(८० टक्के) प्रसिादकांनी सांगितले. परंतू प्रत्यक्ष भेटी व निरीक्षणातून .१०(६६.१६ टक्के) कनिष्ठ महाविद्यायाला पुरशी इमारत असल्याचे दिसून आले. दोन (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये मंदिराच्या आवारात भरत होती. एकंदरित पाच (३३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना पुरेशी इमारत नव्हती.

४०) ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली आहे असे ८(५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले होते. परंतू प्रत्यक्ष भेटी व निरीक्षणातून केवळ ४ (२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली असल्याचे आढळले. यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न तीन (२० टक्के) कनिष्ठ महाविद्यालये होती.

४१) ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोलीचा अभाव असल्याचे ११ (७३.३३ टक्के कनिष्ठ महाविद्यालयात आढळले. त्यांनी विविध पर्यायी व्यवस्था करत असल्याचे सांगितले. परंतू तीन (२० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालय हा भागच नव्हता.

४२) प्राध्यापकांसाठी स्वतंत्र कक्ष आहे असे उत्तर १३(८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी दिले. परंतू प्रत्यक्षात प्रत्येक ठिकाणी प्राध्यापकांना संयुक्त कक्ष होते. तीन (२० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात तर कक्षच अस्तित्वात नव्हता.

४३) प्राध्यापक कक्ष असल्याने कोणतीही समस्या येत नाही असे १०(६६.६६ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. पाच (३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी विविध उपाय योजना करावी लागत असल्याचे सांगितले. यासंदर्भात प्रत्यक्ष निरीक्षणातून असे आढळले की, प्रत्यक्ष प्राध्यापक कक्ष ४ (२६.६६ टक्के) ठिकाणी होते.

४४) विज्ञान प्रयोगशाळेत पुरेसे साहित्य व साधने आहेत असे उत्तर देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ४ (२६.६६ टक्के) होती. बार्शीत तालुक्यात विज्ञान शाखा असणारी कनिष्ठ महाविद्यालये चारच होती व तेथे सुविधा उपलब्ध असल्याचे दिसून आले.

४५) कनिष्ठ महाविद्यालयास पुरेसे व स्वतःच्या मालकीचे क्रीडांगण आहे असे ११ (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले प्रत्यक्ष पाहणीनुसार असे आढळून आले की ७(४६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात पुरेसे व स्वतंत्र क्रीडांगण नव्हते.

४६) क्रीडांगणाचा बहुतांश अभाव असल्याने खेळाचे आयोजन करण्यात समस्या जाणवत होत्या असे प्रत्यक्ष निरीक्षणातून आढळले.

४७) स्वच्छतागृहे स्वतंत्र व पुरेशी असल्याचे ९ (६० टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. प्रत्यक्ष पाहणी केली असता स्वच्छतागृहाची समाधानकारक सोय केवळ २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात होती. अन्यथा इतर बहुतेक कनिष्ठ महाविद्यालयात पुरेशा सोई नव्हत्या. ही खेदजनक बाब असल्याचे दिसून येते.

४८) स्वच्छतागृह पुरेशी नसल्यास अडचणीबाबत ८(५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. बाकी ७ (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी वेगवेगळया अडचणी सांगितल्या, त्या अशा -

१. मुलींच्या संदर्भात विशेष अडचणी येतात.

२. मुलींच्या पालकांनी तक्रारी केल्या.

३. उपलब्ध स्वच्छतागृहे स्वच्छ राहत नाहीत.

४९) विद्यार्थ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शारीरिक शिक्षण सक्तीचे असते असे १३(८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. वैद्यकीय तपासणी केली जात असल्याचेही सांगितले. प्रत्यक्षात शारीरिक शिक्षणाबाबत २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात प्रयत्न केले जात होते. शक्यतो कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जात नसल्याचे स्पष्ट दिसून आले.

५०) पिण्याच्या पाण्याची सोय पाण्याच्या टाकीद्वारे केली असे ८ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. सहा(४० टक्के) प्रतिसादकांनी विविध प्रकारे केली जात असल्याचे सांगितले. एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने मात्र उत्तरच दिले नाही.

यासंदर्भात प्रत्यक्ष निरीक्षण केले असता पिण्याच्या पाण्याबाबत बहुतेक ठिकाणी गैरसोय असल्याचे आढळले.

झ) <u>आर्थिक बाबीविषयीचे निष्कर्ष</u> :-

५१) शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे नाही असे सांगणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १३(८६.६६ टक्के) होती. एका (१६.६६ टक्के) प्रतिसादकाने मात्र स्पष्ट होय असे उत्तर दिले. यासंदर्भात संस्था चालकांशी प्रत्यक्ष चर्चा केली असता शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाचा इतर ठिकाणी शाळेकरीताच वापर केला जात असल्याचे दिसून आले. कनिष्ठ महाविद्यालयात मिळणाऱ्या अनुदानाचा योग्य विनियोग होत नसल्याचे आढळले.

५२) अनुदान कमी पडल्यास व्यवस्था करण्यासाठी इतर मार्ग अवलंबिले जातात असे १० (६६.६६ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. पाच (३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी उत्तर दिले नाही. याचा अर्थ अनुदान कमी पडत नव्हते. प्रत्यक्ष निरीक्षणातून असे दिसून आले की, संस्था विविध मार्गांनी पैसा गोळा करतात. माध्यमिक व वरिष्ठ विभागाचीही कनिष्ठ महाविद्यालयासाठी मदत घेतली जाते.

५३) अपुऱ्या अनुदानाचे विविध परिणाम होत असल्याचे प्रतिसादकांनी सांगितले. ते असे-

१. विविध उपक्रम राबविणे अवघड जाते.

२. शैक्षणिक सामुग्री खरेदीवर मर्यादा पडतात.

५४) शासकीय शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देतो असे सांगणाऱ्या प्राचार्यांचे प्रमाण १४ (९३.३३ टक्के) होते. या बाबतीत समाधानकारक स्थिती होती. विद्यार्थ्यांना योग्य ती मदत केली जात असल्याचे आढळून आले.

५५) हिशोब तपासणी संस्थेकडून केली जाते असे सांगणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १४ (९३.३३ टक्के) होती. प्रत्यक्ष पाहणीतून सर्वच कनिष्ठ महाविद्यालयात हिशोब संस्थेकडून पाहत असल्याचे दिसून आले.

ट) <u>परीक्षाविषयी नियोजन व प्रशासनाच्या माहितीचे निष्कर्ष</u> :-

५६) बर्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात एच.एस.सी. परीक्षेचे आयोजन केले जाते.

५७) एच.एस.सी. च्या विद्यार्थ्यांची परीक्षेची तयारी करण्यासाठी अगोदरच्या वार्षिक प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जातात. असे सर्वच १५ प्रतिसादकांनी सांगितले. अर्थात मागच्या प्रश्नपत्रिका सोडवून घेण्याचे प्रमाण १०० टक्के होते ही बाब समाधानकारक होती.

ठ) कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासन व नियोजनात सुधारणाबाबत निष्कर्ष

५८) कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक नियोजन व प्रशासन सुधारण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रशासन स्वतंत्र असावे, विद्यार्थी संख्येची मर्यादा कमी असावी, प्राचार्यांना स्वायतत्ता द्यावी, स्वतंच सेवक वर्ग असावा असे विविध उपाय १२ (८० टक्के) प्रतिसादकांनी सुचविले.

५९) बहुतेक प्राचार्यांनी विद्यार्थी संख्या सर्वत्र सारखी असावी. प्रत्येक वर्गात ६० विद्यार्थी असावते, अनुदानाच्या पध्दत बदलावी, स्वतंत्र नियमावली असावी. शारीरिक शिक्षण सक्तीचे करावे अशाप्रकारे ११ (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सुधारणात्मक उपाय सांगितले.

## ६.४. शिफारशी

क) प्राचार्याच्या माहितीविषयक शिफारशी :-

१. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यानी कनिष्ठ महाविद्यालयातील वर्गाचे आपल्या पदवीच्या विषयानुरुप अध्यापन करावे. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता व व्यावसायिक पात्रताधारक असावे. त्यांच्या अधिकाराखाली काम करणाऱ्या प्राध्यापकाच्या शैक्षणिक पात्रतेइतकी तरी त्यांची शैक्षणिक पात्रता असावी. त्याशिवाय प्राध्यापकांना ते मार्गदर्शन करु शकणार नाहीत.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यपदी नेमणूक होणाऱ्या व्यक्तींना प्राध्यापक म्हणून किमान १० वर्षाचा कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापन अनुभव असावा.

ख) कनिष्ठ महाविद्यालयांच्या सर्वसामान्य माहितीविषयक शिफारशी :-

३. कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र व्यवस्थापन स्वतंत्र संहिता असावी.

४. कन्या कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रमाण वाढविण्यात यावे.

५. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या मर्यादा ग्रामीण व शहरी भागानुसार अनुक्रमे ४० व ६० इतकी असावी.

६. विनाअनुदानीत तत्वावर दिली जाणारी कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता बंद करुन अनुदानित तत्वावर कायम स्वरुपी कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता देण्यात यावी.

७. कनिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापिकांना माध्यमिकच्या तासिका अध्यापनास देऊ नये. कनिष्ठ महाविद्यालयांचे कामकाज स्वतंत्र असावे.

८. कनिष्ठ महाविद्यालयांतील प्रत्येक विषयांसाठी स्वतंत्र प्राध्यापकाची नियुक्ती करण्यात यावी.

९. कनिष्ठ महाविद्यालयांतील तासिका ४५ ते ५० मिनिटांची असावी.

१०. सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांतील भिंती बोलक्या असाव्यात.

ग) कनिष्ठ महाविद्यालयातील व्यवस्थापनाविषयी शिफारशी-

११. कनिष्ठ महाविद्यालयांची स्थानिक समिती असावी. स्थानिक समितीची प्रत्येक महिन्याला बैठक घेऊन मागील बैठकीचे अहवाल वाचन करुन नवीन विषय हाती घेण्यात यावे.

१२. स्थानिक समिती व प्राचार्यामध्ये सहकार्य असावे. प्राचार्य व संस्था यांनी स्थानिक समितीचे निर्णय मानावेत.

घ) प्राध्यापकांच्या नियोजन व प्रशासनाविषयक शिफारशी :-

१३. प्राध्यापकांकडून अध्यापन विषयाचे वार्षिक नियोजन करुन घ्यावे व त्यानुसार कार्य होते की नाही यावर लक्ष ठेवून आवश्यक त्या सूचना देण्यात याव्या.

१४. सेवांतर्गत प्रशिक्षणाचे फायदे ओळखून त्याबाबत प्राचार्यांनी प्राध्यापकांशी चर्चा करावी व प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविण्याची दक्षता घ्यावी.

१५. कनिष्ठ महाविद्यालयांतील अभ्यासक्रम नियोजित वेळेत पूर्ण करावा.

१६. राखीव वर्गवारीनुसार प्राध्यापक न मिळाल्यास इतर वर्गाचा उमेदवार नियुक्त करण्यात यावा शासनाने त्यांना मान्यता दयावी.

१७. प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या व बदलीच्या वेळी प्राचार्यांचा सल्ला घ्यावा.

१८. प्राध्यापकांच्या बदल्या शक्यतो वर्षारंभी कराव्यात कारण प्राध्यापक, विद्यार्थी, महाविद्यालय यांना बऱ्याच वेळा समायोजन करावे लागते. त्यामुळे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता संभवते.

१९. प्राध्यापकांच्या अध्यापनाचे प्रत्यक्ष वर्गात जाऊन महिन्यातून एकदातरी निरीक्षण करावे व चुकांसंबंधी चर्चा करावी.

२०. शासकीय अधिकाऱ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयांतील नियोजन व प्रशासनाच्या कार्यवाहीची चौकशी करावी.

२१. प्राध्यापकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही याबाबत शासनाने दक्षता घ्यावी.

२२. खाजगी क्लासवर पर्यायी व्यवस्था म्हणून कनिष्ठ महाविद्यालयांत ज्यादा तासांचे आयोजन करावे.

च) विद्यार्थी प्रशासनाच्या माहितीविषयक शिफारशी :-

२३. कला शाखेतील इंग्रजीविषयासाठी स्वतंत्र जादा तासासाठी व्यवस्था करावी. कारण इंग्रजीविषयावरच जास्तीत जास्त कला शाखेचा निकाल अवलंबून असतो. त्यामुळे विशेष लक्ष दयावे.

२४. विज्ञान शाखेचा निकाल वाढविण्यासाठी गणित, विज्ञान विषयांचे अधिक तास घ्यावेत.

२५. अभ्यासात मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता स्वतंत्र नियोजन करावे व त्याचे काळजीपूर्वक कार्यान्वयन करावे.

२६. कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची हजेरी समाधानकारक राहण्यासाठी प्रत्येक तासिकेला हजेरी घेण्यात यावी.

२७. गैरहजर विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करावी.

छ) कर्मचाऱ्यांच्या नियोजन आणि प्रशासनाच्या माहितीविषयक शिफारशी :-

२८. कनिष्ठ महाविद्यालयांकरिता स्वतंत्र कर्मचारी वर्ग असावा.

ज) कनिष्ठ महाविद्यालयांच्या भौतिक सुविधाविषयक शिफारशी :-

२९. विद्यार्थी संख्येनुसार इमारत पुरेशी असावी.

३०. कनिष्ठ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र ग्रंथालय असावे. त्यामध्ये पुरेशे ग्रंथ, नियतकालिके असावित.

३१. ग्रंथालयाची खोली स्वतंत्र व पुरेशी असावी.

३२. कनिष्ठ महाविद्यालयांत प्राध्यापक कक्ष स्वतंत्र असावा.

३३. प्राध्यापक कक्षामध्ये प्राध्यापकांना स्वतंत्र खुर्ची, टेबल व छोटेशे कपाट देण्यात यावे.

३४. कनिष्ठ महाविद्यालयांकरिता स्वतंत्र प्रयोगशाळा असावी त्यामध्ये पुरेशे साहित्य असावे.

३५. कनिष्ठ महाविद्यालयांकरिता स्वतंत्र व पुरेशे क्रीडांगण असावे. त्यासोबत खेळाचे पुरेशे आधुनिक प्रकारचे साहित्य असावे.

३६. कनिष्ठ महाविद्यालयांत मुलांमुलींसाठी व प्राध्यापक, कर्मचारी यांच्याकरिता स्वतंत्र व अत्याधुनिक सोयींची स्वच्छतागृहे असावित.

३७. विद्यार्थ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांत किमान वर्षातून दोन वेळा वैद्यकीय मोफत तपासणी करण्याची व्यवस्था करावी.

३८. विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय उत्तम असावी.

झ) आर्थिक बाबीविषयी शिफारशी :-

३९. कनिष्ठ महाविद्यालयास शासनाने पुरेशे अनुदान दयावे.

४०. महाविद्यालयांच्या विकासासाठी प्राध्यापकांकडून देणगी घेऊ नये.

४१. शासनामार्फत मिळणारी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळवून देण्यास योग्य ते प्रयत्न करावेत.

४२. आर्थिक व्यवहार संस्थेकडून पाहिले जावेत. गडबड होत असल्यास योग्य वेळी कार्यवाही करण्यात यावी.

ट) परीक्षाविषयक नियोजन व प्रशासनाच्या संदर्भात शिफारशी :-

४३. कनिष्ठ महाविद्यालयांत एच.एस.सी. बोर्ड परीक्षांचे आयोजन करताना अतिदक्षता घेण्यात यावी.

४४. एच.एस.सी. च्या विद्यार्थ्यांची अधिक तयारी करुन घेण्यासाठी बोर्डाच्या नियमानुसार परीक्षा घेऊन पेपर तपासून दयावेत. त्यानुसार निकाल तयार करुन जाहीर करावा व विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे.

ठ) कनिष्ठ महाविद्यालयांत नियोजन व प्रशासनामध्ये सुधारणाविषयक शिफारशी :-

४५. उन्हाळी सुट्टीत व दिवाळी सुट्टीत जादा तासांचे आयोजन करावे.

४६. रात्र अभ्यासिकेची सोय करुन शिक्षकांनी नियंत्रण ठेवावे.

४७. कनिष्ठ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र नियमावली असावी.

४८. संस्था चालकांनी प्राध्यापक नियुक्तीसाठी देणगी अथवा वशिला या गोष्टीला अजिबात थारा देऊ नये.

४९. बोगस हजेरी, बोगस दफतर हा गंभीर नैतिक गुन्हा असून संस्थाचालकांनी प्रामाणिकपणे व अत्यंत गांभीर्याने खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे.

५०. शासकीय अधिकाऱ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयांतील नियोजन व प्रशासनाबाबत माहिती संकलित करुन त्रुटीवर योग्य पर्याय योग्य वेळी सुचावावेत.

६.५ <u>पुढील संशोधनासाठी विषय</u> :-

शैक्षणिक प्रशासन आणि नियोजन या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. ही व्याप्ती कमी करुन अभ्यासकाने प्रस्तुत संशोधन केलेले आहे. प्रस्तुत संशोधनात केवळ कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाचा अभ्यास केलेला आहे. शिक्षणाच्या अनेक स्तरांमध्ये नियोजन आणि प्रशासन आढळते. शिक्षणाच्या विविध स्तरांतील नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास होणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन करीत असताना अभ्यासकास नियोजन व प्रशासनातील विविध स्तरांचा अभ्यास करणे शक्य झालेले नाही. शैक्षणिक क्षेत्रातील नियोजन व प्रशासन प्रभावी होण्यासाठी विविध स्तरांचा जरुर विचार व्हावा असे संशोधकास वाटते. प्रस्तुत संशोधन करीत असताना संशोधकास नियोजन आणि प्रशासनातील असे काही विषय आढळले की, त्यावर प्रकाश टाकता येईल. ते विषय पुढे दिलेले आहेत -

६.५.१ <u>प्राथमिक शाळेच्या नियोजन व प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास</u> :-

शिक्षण प्रक्रियेतील नियोजन व प्रशासनाचा प्रारंभ प्राथमिक स्तरापासून होतो. शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचा पाया प्राथमिक स्तर आहे. प्राथमिक शाळेच्या नियोजन व प्रशासनाचा अभ्यास होणे आवश्यक आहे असे वाटते. प्राथमिक शाळेच्या नियोजन व प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा सखोल अभ्यास करुन त्या समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपाययोजना सुचविणे अगत्याचे आहे असे वाटते.

६.५.२ माध्यमिक शाळेच्या नियोजन व प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास :-

प्राथमिक स्तरानंतर माध्यमिक स्तराला शैक्षणिक दृष्टया महत्व देण्यात आले आहे. शिक्षण प्रणालित झालेल्या बदलानुसार माध्यमिक शाळेच्या नियोजन व प्रशासनात बदल होणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. सध्याच्या माध्यमिक स्तरांमध्ये खाजगी माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व नगरपालिका माध्यमिक शाळा यांच्या नियोजन व प्रशासनात समानता आढळत नाही. माध्यमिक शिक्षणासाठी शासनाकडून अधिक आर्थिक तरतूद होणे आवश्यक आहे. माध्यमिक शाळेच्या नियोजन व प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा सखोल अभ्यास करुन त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

६.५.३ वरिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन व प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास :-

वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाचा स्तर व्यक्तीविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण हे समाज जीवन गरजा व आकांक्षा यासाठी निगडीत झाले पाहिजे. सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली पाहिजे. नवनवीन अहवानांना सामोरे जाण्यासाठी नवीन ज्ञान व भावी गरजा यांचा विचार करुन वरिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन व प्रशासनात बदल करणे आवश्यक आहे. वरिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करुन त्या समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

६.५.४ स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय निर्मितीसंबंधी पाहणी करणे :-

सध्या कनिष्ठ महाविद्यालय हा स्तर माध्यमिक शाळा किंवा वरिष्ठ महाविद्यालय यांना जोडून असल्याने या स्तरामध्ये आर्थिक व प्रशासकीय समस्या निर्माण झाल्या आहेत. उच्च माध्यमिक हा स्तर जोडून असल्याने माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर अध्ययन व अध्यापन पध्दतीत फरक जाणवतो. या स्तराचे संपूर्ण नियोजन व प्रशासन स्वतंत्र असावे. या स्तरावर आर्थिक व

प्रशासकीय अधिकार स्वतंत्र असावेत. या दृष्टीकोनातून कनिष्ठ महाविद्यालयांची निर्मिती करणे आवश्यक आहे. या स्तरावरील प्रशासन पाहण्यासाठी स्वतंत्र प्राचार्यांची व शासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

उच्च माध्यमिक हा स्तर स्वतंत्र असावा. या स्तराला स्वतंत्र दर्जा व प्रतिष्ठा देण्यात यावी. माध्यमिक शाळा प्रमुखांच्या किंवा महाविद्यालयीन प्राचार्यांच्या नियंत्रणाखाली हा विभाग नसावा. शैक्षणिक आर्थिक व प्रशासकीय दृष्टीने हा स्तर स्वतंत्र झाल्यास त्यात एकात्मता, समानता व एकसूत्रीपणा निर्माण होईल. त्यासाठी स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय निर्मिती होणे व त्याचा अभ्यास होने आवश्यक आहे असे वाटते.